जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -३६२ दिनांक -१५/०५/२०२३**

## कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर

## रोडवरील पार्क केलेल्या गाडया चोरी करणारा सराईताला पुन्हा केले अटक

कोंढवा पोलीस ठाणे पुणे गुरन.४४२/२०२३, भा.दं.वि. कलम.३७९ प्रमाणे दाखल असणाऱ्या गुन्हयात टाटा कंपनीचा टेम्पो एम.एच.३२ बी ४६०५ हा चोरीस गेला होता. सदर गुन्हा करणाऱ्या अज्ञात आरोपी यांचा शोध घेण्याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष सोनवणे,पोलीस निरीक्षक (गुन्हे)संजय मोगले, पोलीस निरीक्षक (गुन्हे) संदिप भोसले यांनी सुचना दिल्या होत्या.

सदर आरोपी याचा शोध तपासपथक अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक अनिल सुरवसे, व स्टाफ असे गुप्त बातमीदारामार्फतीने व घटनास्थळाच्या आजुबाजुस सीसीटिव्हि फुटेज मध्ये आरोपी हा गाडी चोरी करताना दिसत आहे का? यादृष्टीने शोध घेत होते. यापुर्वी कोंढवा पोलीस ठाणे हद्दीत गुरन.७२३/२०२२,भादवि कलम.३७९ मधील गुन्हयातील टेम्पो व इतर गाडया हया आरोपी ईस्माईल शफी सय्यद, वय ४४ वर्षे, रा.लक्ष्मीनगर, गल्ली नं.०४, कोंढवा बु्‌ा पुणे याने चोरी केलेल्या होत्या. त्यामुळे दाखल गुन्हयातील टेम्पो ही ईस्माईल शफी सय्यद याने चोरी केला असल्याबाबत संशय होता.

त्याअनुषंगाने गुप्त बातमीदारामार्फतीने आरोपी याच्याबाबत माहिती घेत असताना दाखल गुन्हयात चोरी केलेला टाटा कंपनीचा टेम्पो एलपीटी ९०९ तीचा आरटिओ क्रं.एम.एच.३२ बी ४६०५ हा आरोपी ईस्माईल शफी सय्यद, वय ४४ वर्षे, रा.लक्ष्मीनगर, गल्ली नं.०४, कोंढवा बु्‌ा पुणे हा विकण्यासाठी ग्राहक शोधत असल्याबाबत माहिती पोलीस अंमलदार सुहास मोरे,व राहुल थोरात, यांना गुप्त बातमी मिळाली होती.आरोपी याचा शोध घेवुन त्यास दिनांक.०८/०५/२०२३ रोजी पकडुन अटक करुन त्याची मा.न्यायालयाकडुन पोलीस कस्टडी घेवुन सखोल तपास करुन त्याच्याकडुन १)टेम्पो क्रं.एम.एच.३२ बी ४६०५ २)पल्सर मोटार सायकल एम.एच.१२ क्यु. व्हि.४५२४, ३)अॅटिव्हा ५ जी मोटार सायकल एम. एच.१२ क्यु.यु.११४८, ४)रिक्षा क्र एम. एच.१२ क्यु. ई.७६९६, ५)युनिकॉन एम. एच. १२ पी.एफ.८३१० हया गाडया चोरी करुन पोलीसांनी पकडु नये म्हणुन वेगवेगळया ठिकाणी सोडुन दिल्याचे सांगितले.

आरोपी यांच्याकडुन ५ लाखाच्या गाडया जप्त करण्यात आल्या आहेत. सदर आरोपी याने मागिल वर्षी ही कोंढवा पोलीस ठाणेच्या हद्दीतुन ५ गाडया चोरी केल्याचे उघड झाले होते. सदर आरोपी याने पुढीलप्रमाणे गुन्हे केल्याचे उघड झाले आहे.

१) कोंढवा पोलीस ठाणे पुणे येथे गुरन.६६८/२०२२ भादवि कलम.३७९
२) कोंढवा पोलीस ठाणे पुणे येथे गुरन.२०६/२०२२ भादवि कलम.३७९
३) कोंढवा पोलीस ठाणे पुणे येथे गुरन.४३६/२०२२ भादवि कलम.३७९
४) कोंढवा पोलीस ठाणे पुणे येथे गुरन.६७२/२०२२ भादवि कलम.३७९
५) कोंढवा पोलीस ठाणे पुणे गुरन.७२३/२०२२ भा.दं.वि.कलम ३७९

वरिल प्रमाणे कारवाई पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-५, पुणे शहर व सहा.पोलीस आयुक्त, वानवडी विभाग यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.


पोलीस स्टेशन